# प्रेसनोट दि. ०९/१२/२०२४

१९ वा महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा-२०२४ चा उद्घाटन समारंभ आज दि. ०९/१२/२०२४ रोजी १६.३० वाजता राज्य राखीव पोलीस दल, गट क्र. २, पुणे येथील परेड मैदानावर प्रमुख पाहुणे श्री संजय सक्सेना, अपर पोलीस महासंचालक, कायदा व सुव्यवस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे शुभहस्ते संपन्न झाला. श्री प्रशांत बुरडे, अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., पुणे यांनी प्रमुख पाहुणे यांचे पुष्पगुच्छ देवुन स्वागत केले. स्पर्धेत सहभागी २६ संघांनी शिस्तबद्ध संचलन करुन प्रमुख पाहुण्यांना मानवंदना दिली.

श्री प्रशांत बुरडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले व मागील ६२ वा अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा मध्ये महाराष्ट्र राज्य पोलीस दलाच्या संघाने पहिल्यांदाच देशातील प्रथम क्रमांकाचा संघ म्हणुन जनरल चॅम्पियनशिप ट्रॉफी मिळवुन महाराष्ट्र पोलीस दलासाठी ऐतिहासिक कामगिरी केल्याचे तसेच ६६ वा अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा मध्ये महाराष्ट्र राज्य पोलीस दलाच्या संघाने देशातील द्वितीय क्रमांकाचा संघ म्हणुन रनरअप ट्रॉफी मिळवुन महाराष्ट्र पोलीस दलासाठी उल्लेखनिय कामगिरी बाबत प्रमुख पाहुण्यांना माहिती दिली. पाहुण्यांचे हस्ते गतवर्षीच्या ६७ वा अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये पदक विजेत्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांनी स्पर्धकांना व उपस्थितांना नवीन कायद्यांमध्ये समाविष्ट असलेले सायंटिफीक पद्धतीचे तपासामधील महत्व विषद केले. अशा प्रकारचा पोलीस कर्तव्य मेळावा अधिकारी व अंमलदार यांच्यातील तपासाचे कौशल्य वाढीस उपयुक्त आहे, असे नमुद केले. तसेच पदक विजेत्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे स्पर्धेतील कौशल्याचे व्हिडिओ तयार करून तो प्रत्येक पोलीस प्रशिक्षण केंद्रांमध्ये प्रसारीत करावा जेणेकरून, सर्व विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होईल असे सांगितले. सर्व पदक विजेत्यांच्या कौशल्याचा वापर महाराष्ट्रातील सर्व जिल्हयांना करण्याचे आवाहान केले. तसेच स्पर्धकांना निकोप व खेळीमेळीच्या वातावरणात स्पर्धा पार पाडण्याविषयी मार्गदर्शन करुन आगामी अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्याकरिता शुभेच्छा दिल्या व औपचारिकरित्या स्पर्धेचे उद्घाटन केले. ६७ व्या अखिल भारतीय कर्तव्य मेळाव्यामध्ये महाराष्ट्रातील २ सुवर्ण पदक प्राप्त करणाऱ्या श्रीमती मयुरी पवार, सहा.

पोलीस निरीक्षक, दहशतवाद विरोधी पथक यांना उद्घाटन ज्योत आणण्याचा मान देण्यात आला. कोल्हापूर संघप्रमुख श्री रणजीत माने, पोलीस निरीक्षक यांनी स्पर्धकांना शपथ दिली.

सदर कार्यक्रमास श्री प्रशांत बुरडे, अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा.,पुणे, श्री दिपक पांडे, अपर पोलीस महासंचालक, संचालक, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग, म.राज्य, पुणे, श्री शशिकांत महावरकर, सहायक पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड शहर, श्री अशोक मोराळे, विशेष पोलीस महानिरीक्षक, एस.आर.पी.एफ., पुणे, श्री सुनिल फुलारी, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, श्री राजेंद्र डहाळे, विशेष पोलीस महानिरीक्षक, एम.आय.अे., पुणे, श्री सारंग आवाड, पोलीस उप महानिरीक्षक, (प्रशासन) गु.अ.वि., म.रा., पुणे, श्री बसवराज तेली, पोलीस उप महानिरीक्षक, (आर्थिक) गु.अ.वि., म.रा., पुणे, श्रीमती. आंचल दलाल, समावेशक एस.आर.पी.एफ. गट क्र. १, श्रीमती नम्रता पाटील, समादेशक एस.आर.पी.एफ. गट क्र. २ व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते तसेच प्रिंन्ट व इलेक्ट्रॉनिक मिडीयाचे प्रतिनिधी हजर होते.

१९ व्या महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा-२०२४ मधील स्पर्धांचे आयोजन दिनांक ०७/१२/२०२४ ते १२/१२/२०२४ या कालावधीत राज्य राखीव पोलीस दल, गट क्र. १ व गट क्र. २ तसेच महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे येथे गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्फत करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री सारंग आवाड, पोलीस उप महानिरीक्षक, (प्रशासन) गु.अ.वि. यांनी केले तसेच सुत्रसंचलन श्रीमती अर्चना कदम, पोलीस निरीक्षक, गु.अ.वि., म.रा. पुणे व श्री सचिन देवडे, पोलीस नाईक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.२ यांनी केले.